**महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत रेशीम उद्योग विकासाची योजना प्रायोगिक तत्वावर राबविणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
नियोजन विभाग (रोहयो प्रभाग)
शासन निर्णय क्र. मग्रारो-२०१३/प्र.क्र.१३७/मग्रारो-१
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : ०४ मार्च, २०१४

**संदर्भ :** १) ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार, नवीन दिल्ली यांचे पत्र क्र.- ११०१७/१७/२०१३/MGNREGA (UN) (Part-II) दिनांक ८ ऑक्टोबर, २०१३

२) संचालक (रेशीम) यांचे पत्र क्र. रेशीम/कार्या/सी.डी.पी./२०१४/२०२, दि. १६.१.२०१४

३) आयुक्त, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना आयुक्तालय, नागपूर यांचे पत्र क्र. आयुक्तालय/तां.स/१६९/२०१४, दिनांक २९ जानेवारी, २०१४

**प्रस्तावना –**

महाराष्ट्रातील कृषि हवामान आणि जमीन विषयक परिस्थिती तुती लागवडीस व रेशीम कोष निर्मीतीसाठी अनुकुल आहे. तुतीची लागवड व रेशीम कीटकांचे संगोपन ही कामे किफायतशीर आहेत. महाराष्ट्रातील कृषि हवामान, शेती विषयी पर्यावरणासंबंधीचे प्रश्न, ग्रामीण भागात रोजगार निर्मीती व उच्च मुल्यांकित पीक रचना या सर्व गोष्टींचा विचार केल्यास तुती लागवडीद्वारे रेशीम उत्पादन उद्योगास महाराष्ट्रात भरपूर वाव आहे. पडीक जमीनीवर तुती लागवड तसेच ऐन व अर्जुनाची झाडे लागवड केल्यामुळे जमीनीची धुप कमी होते. त्यामुळे महाराष्ट्रात तुती व टसर रेशीमावर आधारीत उद्योग वाढविण्यास मदत होईल तसेच यामुळे ग्रामीण लोकांना रोजगारसुध्दा उपलब्ध होऊ शकणार आहे.

राज्यात सद्यस्थितीत केंद्र पुरस्कृत सी.डी.पी. योजना व राष्ट्रीय कृषि विकास योजना या अंतर्गत रेशीम उद्योग विकासाचा कार्यक्रम राबविण्यात येत आहे. या दोन्ही योजनेचे उद्दिष्ट सारखेच असून समन्वयाने रेशीम उद्योगाचा विकास करणे शक्य आहे. त्यानुषंगाने केंद्र शासनाच्या ग्रामीण विकास मंत्रालयाने वर नमूद केलेल्या दिनांक ८ ऑक्टोबर, २०१३ च्या पत्रान्वये याबाबतची मार्गदर्शक सूचना प्रसिध्द केली आहे. केंद्र शासनाच्या या मार्गदर्शक सूचनांनुसार रेशीम उद्योग विकासाची योजना ही नावीन्यपूर्ण संकल्पना असुन सदर योजने अंतर्गत विविध यंत्रणांचा सहभाग आहे. तसेच या योजने अंतर्गत प्रत्येक आठवड्याला हजेरी पत्रक तांत्रिक अधिकाऱ्याने प्रतिस्वाक्षरीत करणे आवश्यक असून संबंधित लाभधारकाला प्रशिक्षण देणे, जनजागृती करणे व कामांची मोजमापे घेणे या बाबींसाठी पुरेश्या तांत्रिक अधिकारी वर्गाचे पाठबळ मिळणे आवश्यक आहे. त्यामुळे राज्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनंतर्गत रेशीम उद्योग विकासाची योजना प्रायोगिक तत्वावर राबविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्याबाबत शासन खालील निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय –**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत रेशीम उद्योग विकासाची योजना राबण्याबाबत संचालक, (रेशीम) यांनी दिलेल्या प्रस्तावानुसार ही योजना रेशीम विभागाद्वारे प्रायोगिक तत्वावर राबविण्यास सदर शासन निणर्यान्वये मान्यता देण्यात येत आहे. या योजनेची ठळक वैशिष्टये या शासन निर्णयासोबतच्या **परिशिष्ट अ** मध्ये देण्यात आलेली आहेत. तसेच या योजनेची कार्यपध्दती, लाभार्थी निवड व तद्नुषंगिक बाबी पुढीलप्रमाणे राहतील.

(१) **महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत रेशीम उद्योग विकासातील योजनेच्या समाविष्ट बाबी:**

**अ. जमिनीचा विकास करणे** - नापिक जमीनीचे रुपांतर उपयुक्त जमीनीत करणेसाठी निवड केलेल्या जमीनीवरील उपलब्ध वनस्पती ,झूडपी ,झाडे ,काडी ,कचरा साफ करुन जमीन लागवडीसाठी तयार करणे.

**ब. खड्डे खोदणे आणि रोपवन तयार करणे** - मानकानुसार खडड्यांचा आकार व रोपवनाचे निश्चित केलेल्या अंतरानुसार खड्डे खोदणे व त्यामध्ये ४ ते ५ महिने वयाच्या अधिक उत्पादन देणा-या रेशीम खाद्य वृक्षाच्या रोपांची लागवड करणे, त्यांना खते देणे इत्यादी.

**क. जमिनीची मशागत करणे** - माती आणि पाण्याचे संवर्धन होणेसाठी जमीन समतोल करणे, गुराढोरांपासून संरक्षण करणेसाठी संरक्षीत खडडा/बांध तयार करणे व आंतरमशागत करणे.

**ङ पाणी देणे, आळे तयार करणे, निंदणी करणे** - रेशीम खादय वृक्षाचे रोपवन केलेल्या जमिनीतील इतर अनावश्यक झाडांची सफाई करणे, पाणी देणे, निंदणी करणे.

**इ. भर खते देणे** - मानकानुसार शेणखत, कंपोस्ट खत, गांडूळ खत, जैविक खत, इत्यादी खते सुरवातीला देणे आवश्यक आहे. उदा. सुरवातीला ४०० ग्रॅम गांडूळ खत आणि ७५:२५:२५ प्रमाणातील नत्र : स्फुरद : पालाश लागवडीच्या दुस-या तिस-या व चौथ्या वर्षी रोपवनाला देणे आवश्यक आहे.

**ई. रोपवनाचे संरक्षण / रोग व्यवस्थापन करणे** - खादय वृक्षांच्या निरोगी वाढीसाठी त्यांना रोग, किड, लागू नये तसेच बागेच्या/रोपवनाच्या वाढीसाठी केंद्र व राज्याचे संशोधन संस्थेने मान्य केलेले अधिकृत जैविक खते, नीम युक्त खते, किटकनाशक औषधीचा वापर करणे.

**उ. साहित्य व अवजारे** - रोपवनाची उत्पादकता वाढविणेसाठी लागणारी रोपे, खते, रसायने इत्यादी मानकानुसार रोपवनाला देणे.

**ऊ. लागवड पध्दती** - लागवड पध्दतीनुसार त्याला आवश्यक असणा-या लागवड पध्दत (Package of Practices) हया तुती व टसर रोपवनासाठी वेगवेगळया राहतील.

(२) **लाभार्थी निवडीचे निकष :**

**अ)** सदर योजने अंतर्गत खालील प्रवर्गातून लाभधारक निवडण्यात यावा.

१. अनुसूचित जाती
२. अनुसूचित जमाती
३. भटक्या जमाती (Nomadic Tribes)
४. भटक्या विमुक्त जमाती (Denotified Tribes)
५. दारिद्य रेषेखालील इतर कुटूंबे
६. महिला प्रधान कुटूंबे
७. शारिरिक अपंगत्व प्रधान असलेली कुटूंबे
८. भूसुधार योजनेचे लाभार्थी
९. इंदिरा आवास योजनेचे लाभार्थी
१०. अनुसूचित जमातीचे व अन्य परंपरागत वन्य निवासी (वन अधिकार मान्यता) अधिनियम २००६ नुसार पात्र व्यक्ती

११. कृषि कर्ज माफी योजना सन २००८ नुसार अल्प भूधारक (१ हेक्टर पेक्षा जास्त २ हेक्टर पर्यंत) व सिमांत शेतकरी (१ हेक्टर पेक्षा कमी क्षेत्र)

**ब)** केंद्र शासनाच्या नवीन मार्गदर्शक सुचनांनुसार एका ग्रामपंचायत क्षेत्रातील उपरोक्त प्रवर्ग १ ते १० मधील लाभार्थ्यांना सर्वप्रथम लाभ देण्यात यावा व त्या ग्रामपंचायत क्षेत्रातील उपरोक्त प्रवर्ग १ ते १० मधील लाभार्थी संपल्यानंतर अल्पभूधारक व सिमांत शेतकऱ्यांना लाभ देण्यात यावा.

**क)** लाभार्थी हा महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत जॉब कार्ड धारक असावा तसेच त्याला स्वत:च्या लागवडीवर अकुशल मजुर म्हणून काम करणे आवश्यक राहील.

**ड) तुती मातृवृक्षाचे लागवड व संगोपनाच्या कामाची क्षेत्र मर्यादा प्रति लाभार्थी एक एकर क्षेत्रासाठी(०.४० हेक्टर) असावी तसेच तुती लागवड योजना ही बीड, जालना व औरंगाबाद या तीन जिल्हयात प्रायोगिक तत्वावर राबविण्यात यावी.**

**इ) टसर खाद्य वृक्ष, ऐन व अर्जुन रोपांची लागवड व संगोपनाच्या कामाचे क्षेत्र प्रति लाभार्थी एक हेक्टर (२.५ एकर) क्षेत्रासाठी असावी. टसर खाद्य वृक्ष, ऐन व अर्जुन रोपांची लागवड योजना ही गडचिरोली, चंद्रपूर, गोंदिया व भंडारा या चार जिल्हयात प्रायोगिक तत्वावर राबविण्यात यावी.** एकदा एका लाभार्थ्याला लाभ दिल्यानंतर त्याच लाभार्थ्याला पुन्हा लाभ देण्यात येऊ नये किंवा त्या क्षेत्राला (जमीनीचा सर्व्हे नंबर/गट नंबर) पुन्हा लाभ देऊ नये.

**(३) योजना राबविण्याची पध्दत —**

**नियोजन :**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना व सीडीपी योजना या दोन योजनांच्या अभिसरणातून रेशीम विकास योजनेचा लाभ संबंधित लाभधारकांना होण्यासाठी पात्र लाभधारकांनी विहित नमुन्यात अर्ज तहसिल कार्यालयात सादर करावा व त्यांनी तो जिल्हा रेशीम कार्यालयास पाठवावा. याबाबतचा विहित अर्जाचा नमूना तसेच लागवड करण्यासाठी आवश्यक असलेल्या तांत्रिक पात्रता निकष रेशीम संचालनालयाने ठरवून प्रसारित कराव्यात.

रेशीम किटकांचे संगोपन करण्यासाठी मातृवृक्षांचे लागवड व संगोपन करणा-या सर्व कामांमध्ये स्पष्टपणे एकूण क्षेत्र, कामाचे स्वरुप, अंदाजित किंमत, सर्व कामांचा योजनानिहाय खर्च इत्यादी तपशिल नमूद असणे आवश्यक आहे. कोणत्याही कामाची द्विरुक्ती होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

जिल्हा रेशीम कार्यालयाने केंद्रीय रेशीम मंडळाच्या शिफारशीनुसार ग्रामपंचायतीसाठी मंजूर केलेला लाभार्थीनिहाय लागवड प्रकल्प प्रत्येक ग्रामपंचायतीला अवगत करणे आवश्यक आहे. कामांना मंजूरी देण्यासाठी किंवा शेल्फ ऑफ प्रोजेक्टमध्ये समावेश करण्यासाठी ग्रामपंचायतीने त्यांच्या क्षेत्रातील लाभार्थीनिहाय लागवड प्रकल्प ग्रामसभेच्या मान्यतेसाठी सादर करावेत व ग्रामसभेच्या मान्यतेने लाभार्थ्यांची निवड अंतिम करावी.

**अ)** रेशीम किटकांच्या संगोपनासाठी आवश्यक मातृवृक्षाची लागवड ही ज्या ठिकाणी जमीन आणि हवामान खाद्य वृक्षासाठी व किटक संगोपनासाठी योग्य असेल अशा ठिकाणी घेण्यात येईल. एकत्रित समूह विकास योजनेप्रमाणे (cluster development programme) ग्रामपंचायतनिहाय प्रकल्प विकासाचा आराखडयाची व्यावहारिक साध्यता अभ्यासपूर्वक सर्व्हेक्षण करुन प्रकल्प आराखडा तयार करण्याची जबाबदारी रेशीम संचालनालयाची राहील.

**ब)** प्रकल्प विकासाची सर्व प्रकारची कामे प्रकल्प आराखडानुसार लागवडीचे क्षेत्र, निश्चित केलेली कामे, निश्चित केलेले खर्चाची मानके यानुसार दुबार/दुहेरी लाभ (पती व पत्नी) होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

**क)** समूहनिहाय प्रकल्प, लाभार्थी यादी, गांव/वार्डनिहाय प्रकल्प आराखडा ग्रामपंचायत स्तरावर योजना कार्यान्वीत यंत्रणेने (जिल्हा रेशीम कार्यालयाने) तयार करुन ग्रामसभेमध्ये प्रकल्प कार्यान्वीत करावयाच्या तयारीने मान्यतेसाठी ठेवावा.

**ड)** संबंधित जिल्हा रेशीम अधिका-यांनी केंद्रीय रेशीम मंडळाच्या सूचना विचारात घेवून संबंधित ग्रामपंचायत क्षेत्रातील लाभार्थ्यांचा समावेश करुन तुती लागवड ते कोष उत्पादनापर्यन्तच्या बाबींचा समावेश करुन आराखडा तयार करावा व संबंधित ग्रामसभेच्या मान्यतेने सदर प्रकल्प कार्यान्वीत करण्यात यावा.

**इ)** सदर प्रकल्प आराखडयाला ग्रामसभेची मंजूरी प्राप्त झाल्यानंतर त्यातील लाभार्थ्यांचा प्रकल्पाला संबंधित जिल्हा रेशीम अधिकारी श्रेणी-१ / श्रेणी-२ हे त्यांना असलेल्या वित्तीय अधिकारानुसार तांत्रिक मान्यता देतील. त्यानंतर सदर प्रस्ताव प्रशासकिय मान्यता देण्यासाठी तहसिलदार यांना सादर करतील व ते सदर प्रकल्प आराखडयास प्रशासकिय मान्यता देतील.

**(४) प्रकल्प आराखडा :**

**अ.** समुह निहाय प्रकल्प आराखडयाला तांत्रिक मान्यता तथा प्रशासकिय मान्यता मिळाल्यानंतर मंजूर प्रकल्प आराखडयानुसार संबधित तांत्रिक सहाय्यक /जेष्ठ तांत्रिक सहाय्यक यांनी ग्रामपंचायत प्रकल्पनिहाय अंदाजपत्रके (प्राकलने) तयार करुन संबंधित रेशीम विभागाने केंद्रिय रेशीम मंडळाच्या व महात्मा गांधी नरेगाच्या निश्चित मानकानुसार तसेच मजुरी निर्धारीत केलेल्या दरानुसार अंदाजपत्रके तयार करावी.

**आ.** लाभार्थीनिहाय /प्रकल्पनिहाय तुती लागवड करणार आहे तेवढया क्षेत्राचे अंदाजपत्रके (प्राकलन) सहाय्यक/संबंधित तांत्रिक कर्मचारी यांनी तयार करुन रेशीम विकास अधिकारी श्रेणी-१/२/सहाय्यक संचालक/उपसंचालक/संचालक यांना प्रदान केलेल्या वित्तीय अधिकारानुसार तांत्रिक मंजूरी देतील.

**(५) अंदाजपत्रक तयार करणे, तांत्रिक व प्रशासकिय मान्यता :**

ग्रामसभेने लाभार्थ्यांची निवड अंतिम केल्यानंतर रेशीम संचालनालयाच्या तांत्रिक अधिका-याने लाभार्थीनिहाय अंदाजपत्रके तयार करावीत. तद्नंतर रेशीम संचालनालयाच्या अधिका-यानी त्यांच्या वित्तीय अधिकारानुसार सदर अंदाजपत्रकांना तांत्रिक मान्यता देण्याची कार्यवाही करावी. तांत्रिक मान्यता प्राप्त झाल्यानंतर सदर कामांना प्रशासकिय मान्यता देण्याची कार्यवाही संबंधित तहसिलदार यांनी करावी.

**(६) प्रत्यक्ष कार्यान्वयन :**

प्रशासकिय मान्यता दिल्यानंतर तहसिलदार यांनी प्रत्येक कामासाठी हजेरीपत्रक निर्गमित करावेत. प्रत्येक लाभार्थ्याचे काम हे स्वतंत्र काम समजण्यात येईल. ग्रामरोजगार सेवकांनी प्रत्येक कामाचे हजेरीपत्रक सांभाळून ठेवावे व अकुशल मजुराच्या उपस्थितीच्या नोंदी घ्याव्यात. तसेच मंजूर अंदाजपत्रकाप्रमाणे कामे होत असल्याची खात्री करावी. प्रत्येक आठवडयाचे काम पुर्ण झाल्यानंतर ग्रामरोजगार सेवक हजेरीपत्रकावर स्वाक्षरी करतील व सदर हजेरीपत्रक तांत्रिक अधिका-याकडे सुपुर्द करतील. प्रत्येक आठवडयाला कामाचे मोजमाप संबंधित तांत्रिक अधिकारी करतील व त्याच्या नोंदी मोजमाप पुस्तिकेत घेतील. रेशीम विभागाचे अधिकारी सदर कामाच्या मोजमापाची तपासणी करतील तसेच सहायक संचालक, रेशीम विभाग हे नमूना तपासणीची कामे करतील.

## (७) निधीचे व्यवस्थापन :

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत होणा-या खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे. **यानुसार आयुक्त, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, आयुक्तालय, नागपूर व संचालक, रेशीम संचालनालय, नागपुर यांनी संयुक्तपणे लागवडीचे नमुना अंदाजपत्रके तयार करून सर्व संबंधित क्षेत्रीय यंत्रणेस उपलब्ध करून द्यावे.**

| अ. क्र. | लागवड प्रकार | मजुरी | सामुग्री | एकूण | मनुष्य दिवस |
|---|---|---|---|---|---|
| १ | तुती बाग लागवड | ११०४८४ | ६१७३० | १७२२१४ | ६८२ |
| २ | टसर खाद्य वृक्ष ऐन व अर्जुन रोपांची लागवड | १२६८४६ | ४०८२१ | १६७६६७ | ७८३ |

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत मजुरीचा संपूर्ण खर्च संबंधित मजूराला पोस्ट/बँक खात्यामार्फत तहसिलदाराकडून देण्यात येईल. तसेच सामुग्रीचे प्रदान संबंधित लाभधारकांनी व्हाऊचर सादर केल्यानंतर EFMS द्वारे तहसिलदारमार्फत करण्यात यावे.

## (८) अनिवार्य बाबी :

उपरोक्त कार्यक्रम राबवितांना खालील बाबी अनिवार्य आहेत.

१. अकुशल कामे फक्त नोंदणीकृत जॉबकार्डधारक मजुरांकडूनच करून घेण्यात यावीत .तसेच संबंधित लाभधाकरक हा नोंदणीकृत जॉबकार्डधारक असावा आणि त्याने त्याच्या बागेत मजुर म्हणून काम करणे आवश्यक आहे.

२. कामाच्या प्रत्यक्ष ठिकाणी हजेरीपत्रक ठेवण्यात यावे व त्याच्या प्रती ग्रामपंचायत कार्यालयात ठेवण्यात याव्यात.

३. मजुरीचे भूगतान फक्त बँक/पोस्ट ऑफिस खात्यातून करण्यात यावे.

४. कंत्राटदारांना बंदी राहील तसेच मजुर विस्थापित करणाऱ्या यंत्रणाचा वापर करण्यात येवू नये. उदा. ट्रॅक्टरद्वारे नांगरणी करु नये.

५. अर्धकुशल व कुशल मजुरांचे भूगतान हे सामुग्रीचा भाग समजण्यात यावा. तसेच सामुग्रीचा एकूण खर्च हा एकूण प्रकल्पीय किंमतीच्या ४० टक्के पेक्षा जास्त नसावा. मजुरी साहित्याचे ६० : ४० प्रमाण तालुका स्तरावर राखण्यात यावे.

६. अभिसरणाच्या माध्यमातून निर्माण झालेल्या रोजगाराच्या माहितीचे अभिलेखे स्वतंत्रपणे ठेवण्यात यावेत.

७. प्रत्येक कामाला स्वंतत्र युनिक आयडी देण्यात यावा. प्रत्येक कामाची नोंद ग्रामपंचायतीच्या वर्क रजिस्टर मध्ये व मालमत्ता नोंदवही मध्ये करण्यात यावी. सर्व कामाचे सामाजिक अंकेक्षण ग्रामसभेमार्फत करण्यात यावे. सर्व कामांचे मुल्यमापन दक्षता व संनियंत्रण समित्यांमार्फत करण्यात यावे.

८. योजनेत करण्यात आलेली लागवड व संगोपनाच्या सर्व कामांची माहिती ग्रामपंचयातीने जतन करावी तसेच निवडण्यात आलेले लाभार्थ्यांची यादी जॉबकार्ड क्रमांकासह परिरक्षित करावी. लाभार्थ्याचा हिस्सा, सीडीपी/इतर योजनेतून घेतलेले सहाय्य व महात्मा गांधी नरेगा मधून केलेला खर्च ईत्यादि सविस्तर तपशील स्वतंत्रपणे मालमत्ता नोंदवहीत नोंदविण्यात यावा.

९) १५ दिवासांच्या आत मजुरांना मजुरीचे प्रदान करणे आवश्यक आहे. या संदर्भातील भूगतान आदेश तहसिलदारांमार्फत काढण्यात येतील.

१०) मापनपुस्तिकेमध्ये रोजगाराच्या नोंदी सीडीपी महात्मा गांधी नरेगा अभिसरण योजनेअंतर्गत केलेल्या कामाच्या नोंदी स्वतंत्र घेणे गरजेचे आहे.

**(९) संनियंत्रण व सादरीकरण :**

१) महात्मा गांधी नरेगा अंतर्गत करण्यात येणाऱ्या सर्व खर्चाची सविस्तर माहिती कामनिहाय (मजुर उपस्थिती, मजुरीचे प्रदान) नरेगा सॉफ्ट वर अपलोड करण्यात यावी. नरेगा सॉफ्टवर या कामाची माहिती प्रवर्ग IV मध्ये अपलोड करावी.

२) वर्क मोड्यूल मध्ये कामाच्या अचूक नोंदी कराव्यात. कामाच्या क्षेत्र एककाच्या नोंदी करतांना (एकर/हेक्टर) विशेष काळजी घेण्यात यावी. तसेच अभिसरणाचा सविस्तर तपशिल जसे की, महात्मा गांधी नरेगा व्यतिरिक्त झालेला योजनानिहाय खर्च व रक्कम याची माहिती अपलोड करण्यात यावी.

३) सद्या महात्मा गांधी नरेगा मधून खर्च करण्यात येणाऱ्या रकमांकरीता जे लेखे ठेवण्याची पद्धत आहे त्याच पद्धतीचा वापर उपरोक्त योजनेत करण्यात यावा.

४) प्रत्येक आर्थिक वर्षाच्या शेवटी जींवत झाडांची टक्केवारी, झाडाची स्थिती या संदर्भातील माहिती नरेगा सॉफ्टवर कशापद्धतीने भरावी याचे मार्गदर्शन सुचना केंद्र शासनाकडून प्राप्त होणार आहेत. सदर मार्गदर्शक सूचना केंद्र शासनाकडून प्राप्त झाल्यानंतर क्षेत्रीय यंत्रणेस कळविण्यात येतील.

५) उपरोक्त कार्यमक्रमाचे संनियंत्रण संयुक्तपणे जिल्हा कार्यक्रम समन्वयक तथा जिल्हाधिकारी, जिल्हा रेशीम अधिकारी, तहसिलदार यांनी करावे. या करीता रेशीम संचालनालयाने एका नोडल अधिकाऱ्याची नेमणूक करावी.

६) उपरोक्त कार्यक्रमांतर्गत करण्यात आलेल्या कार्यवाहीचा मासिक अहवाल जिल्हा रेशमी विकास अधिकाऱ्याने जिल्हा कार्यक्रम समन्वयक तथा जिल्हाधिकारी यांना सादर करावा. जिल्हाधिकारी यांनी या कार्यक्रमाचा एकत्रित त्रैमासिक अहवाल विभागीय आयुक्त यांना सादर करावा व विभागीय आयुक्त यांनी त्यांच्या विभागाचा एकत्रित अहवाल प्रत्येक ६ महिन्यांनतर शासनास सादर करावा.

७) उपरोक्त कार्यक्रमाच्या नियमित तपासण्या कराव्यात.

**(१०)** संचालक, रेशीम संचालनालय, नागपूर व आयुक्त, महात्मा गांधी नरेगा आयुक्तालय, नागपूर यांनी सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करावी.

**(११)** सदर शासन निर्णय ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे पत्र क्र. j-११०१७ /१७ / २०१३/MGNREGA (UN) (Part-II) दिनांक ८ ऑक्टोबर, २०१३ सोबत प्राप्त झालेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार तसेच वस्त्रोद्योग विभाग यांनी दिलेल्या मंजुरीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय हा महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्यांचा संगणक संकेतांक क्रमांक २०१४०३०४१६२४०५९९१६ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

वि.गि।२८

**( वि. गिरिराज )**
**प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

मा. राज्यपालांचे सचिव,
मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
मुख्य सचिवांचे स्वीय सहाय्यक,
अतिरिक्त मुख्य सचिव,
शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई.

संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय,
महासंचालक, माहिती व जनसंपर्क, मंत्रालय, मुंबई.(प्रसिध्दीकरिता)
सर्व विभागीय आयुक्त,
आयुक्त, महात्मा गांधी नरेगा, नागपूर
सर्व जिल्हाधिकारी (बृहन्मुंबई वगळून),
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद
प्रधान मुख्य वन संरक्षक, नागपूर,
आयुक्त (कृषि) महाराष्ट्र राज्य, पुणे,
संचालक, (रेशीम) रेशीम संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नागपूर
महालेखापाल, महाराष्ट्र राज्य (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/ नागपूर,
महालेखापाल, महाराष्ट्र राज्य (लेखा परिक्षा), मुंबई/ नागपूर,
उप सचिव, महाराष्ट्र विधान मंडळ रोजगार हमी समिती, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय मुंबई,
सर्व उपजिल्हाधिकारी (रोहयो),
सर्व जिल्हा रेशीम विकास अधिकारी
कक्ष अधिकारी,संग्राम कक्ष, ग्राम. व जलसं. विभाग,मंत्रालय, मुंबई.(महाऑनलाईनवर प्रसिद्धीसाठी)
सर्व जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी,
सर्व उप सचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी, नियोजन विभाग (रोहयो),
सारसंग्रह रोहयो-१/निवडनस्ती, रोहयो-१.

## रेशीम लागवड विकास योजनेचे ठळक वैशिष्टये दशविणारे परिशिष्ट-अ

### अ) तुती लागवड

| अ.क्र. | बाब | वैशिष्टये |
|---|---|---|
| १ | लागवड क्षेत्र मर्यादा | १ एकर (०.४० हेक्टर) प्रति लाभार्थी |
| २ | कालावधी | ३ वर्षे |
| | प्रथम वर्ष | लागवड व संगोपन |
| | द्वितीय व तृतीय वर्ष | संगोपन |
| ३ | अंदाजत्रकीय किंमत (तीन वर्षाकरीता) प्रति ऐकर | |
| | मजुरी | रू. १,१०,४८४/- (६८२ मणुष्य दिन) |
| | सामुग्री | रू. ६१,७३०/- |
| | एकूण | रू. १,७२,२१४/- केंद्रीय रेशीम मंडळाचे काही हिस्सा असल्यास सदर हिस्सा सामुग्रीत समायोजित करावा. |
| ४ | मजुरी साहित्याचे प्रमाण | रू. १,१०४८४ : रू ६१७३० (६४ : ३६) |
| ५ | प्रायोगिक योजनेत समाविष्ट जिल्हे | बीड, जालना व औरंगाबाद |
| ६ | तांत्रिक मान्यता | जिल्हा रेशीम विकास अधिकारी |
| ७ | प्रशासकीय मान्यता | तहसीलदार |
| ८ | इतर योजनेचा हिस्सा | केंद्रीय रेशीम मंडळ किंवा इतर योजनेचा हिस्सा हा सामुग्रीमध्ये समायोजित करावा |

### ब) टसर, अर्जुन व ऐन रोपांची लागवड :

| अ.क्र. | बाब | वैशिष्टये |
|---|---|---|
| १ | लागवड क्षेत्र मर्यादा | २.५ एकर (१ हेक्टर) प्रति लाभार्थी |
| २ | कालावधी | ४ वर्षे |
| | प्रथम वर्ष | लागवड व संगोपन |
| | द्वितीय, तृतीय व चतुर्थ वर्ष | संगोपन |
| ३ | अंदाजत्रकीय किंमत (चार वर्षाकरीता) प्रति हेक्टर | |
| | मजुरी | रू. १,२६,८४६/-(७८३ मणुष्य दिन) |
| | सामुग्री | रू. ४०,८२१/- |
| | एकूण | रू. १,६७,६६७/- केंद्रीय रेशीम मंडळाचे काही हिस्सा असल्यास सदर हिस्सा सामुग्रीत समायोजित करावा. |
| ४ | मजुरी साहित्याचे प्रमाण | रू. १,२६,८४६ : रू ४०,८२१ (७६ : २४) |
| ५ | प्रायोगिक योजनेत समाविष्ट जिल्हे | गडचिरोली, चंद्रपूर, गोंदिया व भंडारा |
| ६ | तांत्रिक मान्यता | जिल्हा रेशीम विकास अधिकारी |
| ७ | प्रशासकीय मान्यता | तहसीलदार |
| ८ | इतर योजनेचा हिस्सा | केंद्रीय रेशीम मंडळ किंवा इतर योजनेचा हिस्सा हा सामुग्रीमध्ये समायोजित करावा. |